RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-क

वर्ष १२, अंक ४०] सोमवार, सप्टेंबर २१, २०२६/भाद्रपद ३०, शके १९४८ [पृष्ठे ५८, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ६२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले
(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)
वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२६.

अधिसूचना

विद्युत अधिनियम, २००३.

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/विनियम/२०२६/०७८२.— महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६)च्या कलम ३२ च्या उप-कलम (३), कलम ३३ च्या उप-कलम (४), कलम ६६, कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) आणि (एच) आणि कलम १८१ च्या खंड (जी) आणि (झेडपी) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्यास या संदर्भात समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन, याद्वारे खालीलप्रमाणे विनियम करीत आहे :-

१ संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :-

(१) या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) हे विनियम, या विनियमांतील वाणिज्यिक व्यवस्था, तफावत आकार आणि अन्य तरतुदींखेरीज, शासकीय राजपत्रातील त्यांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून अंमलात येतील.

परंतु असे की, या विनियमांच्या खंड (७) आणि (१०) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली वाणिज्यिक व्यवस्था आणि तफावत आकारांच्या संबंधातील तरतुदी, आणि अन्य तरतुदी, असल्यास, आयोगाने आदेशाद्वारे स्वतंत्रपणे अधिसूचित करावयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

परंतु आणखी असे की, वरील पहिल्या परंतुका अंतर्गत उल्लेख केलेल्या अशा दिनांकाच्या अधिसूचनेपर्यंत, ऊर्जेचे लेखे ठेवण्याच्या आणि तफावतीची हिशोबपूर्ती करण्याच्या प्रयोजनासाठी, आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम,२०१९ मधील तरतुदी, वेळोवेळी केलेल्या संबंधित सुधारणांसह, कार्यान्वित राहतील.

२. उद्दिष्ट

हे विनियम वाणिज्यिक कार्यपध्दतीच्या माध्यमातून असे सुनिश्चित करतात की, ग्रिडचे उपयोगकर्ते ग्रिडची सुरक्षा आणि स्थैर्यासाठी वीज खेचणी आणि विजेच्या अंतःक्षेपणाच्या त्यांच्या निर्धारणाशी तफावत घेणार नाहीत आणि त्याचे पालन करतील.

३. व्याख्या आणि अन्वयार्थ

(१) संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये :-

(ए) "**अधिनियम**" म्हणजे विद्युत अधिनियम, २००३, (२००३ चा ३६);

(बी) "**प्रत्यक्ष वीज खेचणे**" काल-गटात प्रत्यक्ष वीज खेचणे म्हणजे वीज खरेदीदाराने खेचलेली, इंटरफेस मीटरने परिमापन केलेली, वीज;

(सी) "**वीजेचे प्रत्यक्ष अंतःक्षेपण**" काल गटात विजेचे प्रत्यक्ष अंतःक्षेपण म्हणजे वीज विक्रेत्याने अंतःक्षेपित केलेली, इंटरफेस मीटरने परिमापन केलेली, वीज;

(डी) "**आनुषंगिक सेवा**" म्हणजे केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आनुषंगिक सेवा) विनियम, २०२२ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आनुषंगिक सेवा होय.

(इ) "**आनुषंगिक सेवा विनियम**" म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेले केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आनुषंगिक सेवा) विनियम, २०२२ आणि त्यामध्ये याचे पुनराधिनियमन देखील समाविष्ट आहे.

(एफ) "**विजेची क्षेत्रनिहाय किंमत**" किंवा "**एसीपी**" म्हणजे विद्युत बाजाराचे पारेषण मार्गिकेवरील ताणामुळे वेगवेगळ्या विभागांत विभाजन झाल्यानंतर (मार्केट स्प्लिटिंग), विवक्षित क्षेत्रातील (क्षेत्रांमध्ये) विजेच्या सर्व वैध खरेदी आणि विक्रीच्या बोली विचारात घेऊन पॉवर एक्स्चेंजमध्ये एका काल-गटासाठी निश्चित झालेली विजेच्या कराराची किंमत;

(जी) "**उपलब्ध क्षमता**" म्हणजे पवन किंवा सौर किंवा पवन-सौर स्त्रोतांच्या हायब्रिडवर आधारित निर्मिती केंद्रासाठी, ज्या प्रादेशिक कंपन्या (एन्टीटी) आहेत, उपलब्ध क्षमता म्हणजे विशिष्ट काल-गटामध्ये विजेचे उत्पादन करण्यास सक्षम असलेल्या पवन टर्बाइन्स किंवा सौर इन्व्हर्टर्सची संचयी क्षमता होय आणि ही क्षमता मंजूर करण्यात आलेल्या जोडणीयतेच्या प्रमाणाशी मर्यादित असेल.

(एच) "**आधारभूत (बेस) दर**" म्हणजे भारतीय स्टेट बँकेने वेळोवेळी जाहीर केल्यानुसार, 'निधीवर आधारित व्याज दराने कर्जावर एक वर्षात होणारा सीमान्तिक खर्च' ('one-year marginal Cost of Funds-based Lending Rate' (MCLR));

(आय) "**खरेदीदार**" म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० नुसार नियोजित केलेल्या व्यवहाराच्या माध्यमातून विजेची खरेदी करणारे वितरण

परवानाधारक, मानीव वितरण परवानाधारक, किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या पूर्ण मुक्त प्रवेश ग्राहकांसह व्यक्ती होय;

(जे) **"संयोजकता विनियम"** म्हणजे वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे, मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० आणि वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ मधील तरतुदी होय;

(के) **"आयोग"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८२ च्या उप-कलम (१) मध्ये उल्लेख करण्यात आलेला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(एल) **"संविदा दर"** म्हणजे (एक) डब्ल्युएस विक्रेता किंवा एमएसडब्ल्यु विक्रेता किंवा अशी अन्य एन्टीटी, लागू असल्याप्रमाणे, ज्यांचा वीज दर अधिनियमांच्या कलम ६२ अंतर्गत वीज दर आदेशामध्ये किंवा कलम ६३ किंवा ८६(१)(बी) अंतर्गत निश्चित किंवा स्वीकृत किंवा मान्य करण्यात येतो, त्यांच्या संबंधात संविदा दर म्हणजे, समुचित आयोगाद्वारे निश्चित किंवा स्वीकृत किंवा मान्यता दिलेला रु/युनिट वीज दर; किंवा (दोन) डब्ल्युएस विक्रेता किंवा एमएसडब्ल्यु विक्रेता किंवा अशी अन्य एन्टीटी, लागू असल्याप्रमाणे, ज्यांचा वीज दर अधिनियमांच्या कलम ६२ किंवा कलम ६३ किंवा ८६(१)(बी) अंतर्गत निश्चित किंवा स्वीकृत किंवा मान्य करण्यात येत नाही आणि जे पॉवर एक्स्चेंजच्या माध्यमातून विजेची विक्री करतात, त्यांच्या संबंधात संविदा दर म्हणजे, संबंधित व्यवहारासाठी पॉवर एक्स्चेंजमध्ये मिळालेला दर; किंवा (तीन) मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून तृतीय पक्षकाराला विजेची विक्री करणारा डब्ल्युएस विक्रेता किंवा एमएसडब्ल्यु विक्रेता किंवा अशा अन्य एन्टीटीच्या संबंधात लागू असल्याप्रमाणे किंवा नुतनशील ऊर्जा स्त्रोतांच्या आधारावर स्व-वापरासाठी वीज निर्मिती करणाऱ्या संयत्राच्या (कॅप्टिव्ह जनरेटिंग प्लान्ट) स्व-वापराच्या बाबतीत संविदा दर म्हणजे, संबंधित काल-गटासाठी सर्व पॉवर एक्स्चेंजच्या एकीकृत-डे अहेड मार्केट सेगमेंटची भारांकित सरासरी एसीपी किंवा केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे; (चार) कॅप्टिव्ह वापरासह बहुविध संविदांच्या किंवा व्यवहारांच्या बाबतीत संविदा दर म्हणजे, अशा सर्व संविदांच्या किंवा व्यवहारांच्या, जसे असेल तसे, संविदा दराची भारांकित सरासरी किंवा संविदा दर नसल्यास, संबंधित काल गटासाठी सर्व पॉवर एक्स्चेंजच्या एकीकृत-डे अहेड मार्केट सेगमेंट्सची भारांकित सरासरी एसीपी किंवा केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्व संविदांना लागू राहील.

(एम) **"डे अहेड मार्केट" (डीएएम)** म्हणजे विद्युत बाजार जेथे वीज व्यवहाराच्या (टी) दिनांकाच्या पुढील दिवशी (टी+१) विजेची प्रत्यक्ष प्राप्ती (डिलिव्हरी) होते आणि त्याचे नियमन केंद्रीय विद्युत नियामक आयोग (विद्युत बाजार) विनियम, २०२१ (वेळोवेळी करण्यात आलेल्या

सुधारणांप्रमाणे), केंद्रीय आयोगाने मान्यता दिलेल्या पॉवर एक्स्चेंजच्या नियम आणि उप-विधी द्वारा होते;

(एन) **"तफावत"** वीज विक्रेत्यासाठी काल-गटात तफावत म्हणजे त्याने प्रत्यक्ष अंत:क्षेपित केलेली एकूण वीज वजा त्याची एकूण निर्धारित वीजनिर्मिती आणि वीज खरेदीदारासाठी काल-गटात तफावत म्हणजे त्याने प्रत्यक्ष खेचलेली एकूण वीज वजा त्याची एकूण निर्धारित वीज होय आणि त्याची परिगणना या विनियमांच्या विनियम ७ नुसार करण्यात येईल;

(ओ) **"तफावत दर किंवा "तफावत आकार"** म्हणजे या विनियमांच्या विनियम १० अंतर्गत ठरवून दिल्याप्रमाणे लागू असलेल्या काल-गटाकरिता तफावतीसाठीचे आकार होय.

(पी) **"तफावत आणि आनुषंगिक सेवा पूल अकाऊण्ट - प्रादेशिक"** म्हणजे केंद्रीय विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२४ नुसार, प्रत्येक प्रदेशातील प्रादेशिक भार प्रेषण केंद्र किंवा राष्ट्रीय भार प्रेषण केंद्राद्वारे ठेवावयाचा किंवा संचलित करावयाचा लेखा होय.

(क्यु) **"निर्यातक्षम क्षमता"** म्हणजे सहनिर्मिती/बायोमास प्रकल्पांचा निर्धारित कॅप्टीव्ह वापर (हंगामी आणि बिगर-हंगामी) वजा केल्यानंतर आंतरजोडणी बिंदूच्या ठिकाणी असलेली त्या सहनिर्मिती/बायोमास प्रकल्पांची क्षमता होय.

(आर) **"पूर्णत: मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे पारेषण यंत्रणा किंवा वितरण यंत्रणेला जोडलेले मुक्त प्रवेश ग्राहक परंतु त्यांची राज्यातील वितरण परवानाधारकांशी कोणतीही करारांतर्गत मागणी नसेल;

(एस) **"गेमिंग"** या विनियमांच्या संबंधात गेमिंग म्हणजे तफावतीसाठीच्या शुल्काच्या माध्यमातून अनुचित वाणिज्यिक लाभ घेण्यासाठी कोणत्याही विक्रेत्याने घोषित क्षमतेची हेतूपूरस्सर केलेली चुकीची घोषणा किंवा कोणत्याही खरेदीदाराने वीज-खेचणीच्या वेळापत्रकाची हेतूपूरस्सर केलेली चुकीची घोषणा होय;

(टी) **"सामान्य विक्रेता"** म्हणजे पवन किंवा सौर किंवा पवन-सौर हायब्रिड स्त्रोतांच्या व्यतिरिक्त अन्य स्त्रोतांवर आधारित निर्मिती केंद्राच्या बाबतीत एक विक्रेता होय.

(यु) **"ग्रीड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६(१)(एच) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेली राज्य ग्रीड संहिता;

(व्ही) **"भारतीय विद्युत ग्रीड संहिता" (किंवा आयइजीसी)** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७९(१)(एच)

अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेली ग्रिड संहिता होय;

(डब्ल्यु) **"एकीकृत डे अहेड मार्केट"** म्हणजे जेथे डे अहेड मार्केट (डीएएम), ग्रीन डे अहेड मार्केट (ग्रीन डीएएम), आणि उच्च किंमत डे अहेड मार्केट (एच-डीएएम) अंतर्गत सामुहिक व्यवहारांसह, पॉवर एक्स्चेंजमध्ये डे अहेड करारांचा व्यवहार करण्यात येतो.

(एक्स) **"इंटरफेस मीटर"** या संज्ञेचा अर्थ, वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसवणे आणि प्रचालन) विनियम, २००६ आणि त्याचे कोणतेही पुनराधियमन आणि तरतुदी अंतर्गत किंवा वेळोवेळी सुधारणा केलेल्या एमइजीसी २०२० मधील मीटरींग संहितेच्या तरतुदी अंतर्गत व्याख्या केल्यानुसार इंटरफेस मीटर्स असा राहील;

(वाय) **"भार प्रेषण केंद्र"** म्हणजे राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र, प्रादेशिक भार प्रेषण किंवा राज्य भार प्रेषण केंद्र, जसे असेल तसे;

(झेड) **"एमओडी मार्गदर्शक तत्त्वे"** म्हणजे आयोगाने वेळोवेळी मान्यता दिल्यानुसार, मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० च्या विनियम ३३ आणि त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणा अंतर्गत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कमी खर्चाची वीज प्रथम खरेदी करण्यासंबंधीच्या (मेरीट ऑर्डर डिस्पॅच) प्रचालनाची तत्त्वे होय.

(एए) **"एमएसडब्ल्यु विक्रेता"** म्हणजे महानगर पालिकेच्या घन कचऱ्यावर (एमएसडब्ल्यु) आधारीत वीजनिर्मिती केंद्राच्या बाबतीत एक विक्रेता, ज्यामध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करुन तयार केलेले इंधन वापरुन (आरडीएफ) वीज तयार करणाऱ्या एमएसडब्ल्यु निर्मिती केंद्राचा समावेश असतो.

(बीबी) **"तफावतीसाठीच्या आकारांचा सामान्य दर" (एनआर)** म्हणजे या विनियमांच्या विनियम ८ मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे तफावतीसाठीचे (पैसे/प्रति युनिट मध्ये) आकार होय.

(सीसी) **"मुक्त प्रवेश विनियम"** म्हणजे वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६, आणि त्यामध्ये त्यानंतर केलेल्या कोणत्याही सुधारणांचा समावेश राहील;

(डीडी) **"अंशत: मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे पारेषण यंत्रणा किंवा वितरण यंत्रणेला जोडलेले मुक्त प्रवेश ग्राहक आणि ज्याच्या कराराबध्द मागणीचा काही भाग राज्यातील वितरण परवानाधारकासोबत असेल;

(इइ) **"प्रादेशिक एन्टीटी"** म्हणजे अशी व्यक्ती ज्याचे मीटरींग आणि ऊर्जा लेखांकन प्रादेशिक भार प्रेषण केंद्राद्वारे प्रादेशिक स्तरावर करण्यात येते.

(एफएफ) **"संदर्भ आकार दर" किंवा आरआर"** म्हणजे (एक) सामान्य विक्रेता, ज्यांचा वीज दर अधिनियमांच्या कलम ६२ अंतर्गत वीज दर आदेशामध्ये किंवा कलम ६३ किंवा ८६(१)(बी) अंतर्गत निश्चित किंवा स्वीकृत किंवा मान्य करण्यात येतो, त्याच्या संबंधात संविदा दर म्हणजे, समुचित आयोगाने निश्चित किंवा स्वीकृत किंवा मान्यता दिलेला रु/युनिट वीज दर इंधन समायोजन अधिभारासह (एफएसए) आणि संबंधित आठवड्यासाठी मेरिट ऑर्डर डिस्पॅचकरिता विचारात घेतलेला वीज दर; किंवा (दोन) सामान्य विक्रेता, ज्याचा वीज दर अधिनियमांच्या कलम ६२ किंवा कलम ६३ किंवा ८६(१)(बी) अंतर्गत निश्चित किंवा स्वीकृत किंवा मान्यता दिल्याप्रमाणे नाही आणि जे पॉवर एक्स्चेंजच्या माध्यमातून विजेची विक्री करतात त्यांच्या संबंधात संविदा दर म्हणजे, संबंधित व्यवहासाठी पॉवर एक्स्चेंजमध्ये मिळालेला दर; किंवा (तीन) मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून तृतीय पक्षकाराला विजेची विक्री करणाऱ्या सामान्य विक्रेत्याच्या किंवा नुतनशील ऊर्जा स्त्रोतांव्यतिरिक्त अन्य स्त्रोतांवर आधारित स्व-वापरासाठी वीज निर्मिती करणाऱ्या संयत्राच्या (कॅप्टिव्ह जनरेटिंग प्लान्ट) स्व-वापराच्या बाबतीत संविदा दर म्हणजे, संबंधित काल-गटासाठी सर्व पॉवर एक्स्चेंजच्या एकीकृत-डे अहेड मार्केट सेगमेंटची भारांकित सरासरी एसीपी किंवा केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे; (चार) कॅप्टिव्ह वापरासह बहुविध संविदांच्या किंवा व्यवहारांच्या बाबतीत संविदा दर म्हणजे, अशा सर्व संविदांच्या किंवा व्यवहारांच्या, जसे असेल तसे, संदर्भ दराची भारांकित सरासरी किंवा संविदा दर नसल्यास, संबंधित काल गटासाठी सर्व पॉवर एक्स्चेंजच्या एकीकृत-डे अहेड मार्केट सेगमेंट्सची भारांकित सरासरी किंवा केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्व संविदांना लागू राहील.

(जीजी) **"नदीच्या पाण्यावर चालणारे निर्मिती केंद्र" किंवा "आरओआर निर्मिती केंद्र"** म्हणजे असे निर्मिती केंद्र ज्याला नदीच्या प्रवाहावर वरच्या बाजूला मोठे जलाशय नसते;

(एचएच) **"निर्धारित वीजनिर्मिती" किंवा "निर्धारित अंत:क्षेपण"** कोणत्याही काल-गट किंवा कोणत्याही कालावधीसाठी निर्धारित वीजनिर्मिती किंवा निर्धारित अंत:क्षेपण म्हणजे राज्य भार प्रेषण केंद्राने आनुषंगिक सेवांसाठी दिलेल्या निर्धारणासह मेगावॅट किंवा एमडब्ल्युएच एक्स-बस मधील वीजनिर्मिती किंवा अंत:क्षेपणाचे निर्धारण (शेड्युल);

(आयआय) **"निर्धारित वीज खेचणे"** कोणत्याही काल-गट किंवा कोणत्याही कालावधीसाठी निर्धारित वीज खेचणे म्हणजे राज्य भार प्रेषण केंद्राने आनुषंगिक सेवांसाठी दिलेल्या निर्धारणासह मेगावॅट किंवा एमडब्ल्युएच एक्स-बसमध्ये विजेचे प्रेषण करण्याचे निर्धारण/वेळापत्रक (शेड्युल);

(जेजे) **"विक्रेता"** म्हणजे मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार निर्धारीत केलेल्या व्यवहाराच्या माध्यमातून विजेचा पुरवठा करणारी व्यक्ती, ज्यामध्ये निर्मिती केंद्राचा समावेश असेल;

(केके) **"राज्य तफावत पूल अकाऊण्ट"** म्हणजे खरेदीदार आणि विक्रेत्यांनी विजेच्या तफावतीमुळे केलेल्या आय-व्ययासाठीचे राज्य अकाऊन्ट;

(एलएल) **"राज्य एन्टीटी"** म्हणजे अशी व्यक्ती जी राज्य भार प्रेषण केंद्राच्या नियंत्रण क्षेत्रामध्ये आहे आणि ज्याच्या ऊर्जेचे मापन व लेखांकन करण्याचे काम राज्य पातळीवर करण्यात येते;

(एमएम) **"काल-गट"** म्हणजे भारतीय विद्युत ग्रिड संहितेमध्ये व्याख्या करण्यात आल्यानुसार काल-गट होय;

(एनएन) **"व्हर्च्युअल राज्य एन्टीटी"** म्हणजे या विनियमांमध्ये आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे.

(ओओ) **"डब्ल्युएस विक्रेते"** म्हणजे पवन किंवा सौर स्त्रोतांवर किंवा पवन-सौर स्त्रोतांच्या हायब्रिडवर आधारित निर्मिती केंद्राच्या बाबतीत विक्रेता आणि त्यामध्ये साठवणूक किंवा साठवणुकीशिवाय असलेल्या सौर किंवा पवन किंवा हायब्रिड निर्मिती केंद्राचा समावेश असेल.

(२) वर नमूद केलेल्या व्यतिरिक्त आणि संदर्भानुसार विरुध्द नसेल किंवा विषयानुसार अन्यथा आवश्यकता असल्यास, या विनियमांत वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द व उक्ती, परंतु अधिनियमांमध्ये किंवा या आयोगाच्या अन्य कोणत्याही विनियमांमध्ये ज्यांची व्याख्या करण्यात आलेली आहे त्यांचा अर्थ त्यांना अनुक्रमे अधिनियमात किंवा अन्य कोणत्याही विनियमांमध्ये देण्यात आलेल्या अर्थानुसार राहील.

या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

४. प्रयोज्यता

(१) हे विनियम, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करुन अल्प-कालिन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेश किंवा दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या विजेच्या वहन व्यवहारांना, खालील अटींच्या अधीन राहून, लागू राहतील.

(२) या विनियमांतर्गत तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले सर्व सामान्य विक्रेते, मुक्तप्रवेश निर्माते, स्व-वापराकरिता ऊर्जा निर्मिती करणाऱ्या (कॅप्टीव्ह) वीजनिर्मात्यांना (इन-सिट्यु कॅप्टीव्ह निर्माते वगळून) लागू राहील.

परंतु असे की, हे विनियम राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या सर्व लघु जल-विद्युत संयत्रांसाठी लागू राहतील. तथापि, डीएसएम विनियम, २०२६ खालील त्यांच्या वाणिज्यिक हिशोबपूर्तीस आयोगाने स्वतंत्रपणे अधिसूचित करावयाच्या दिनांकापासून प्रारंभ होईल.

परंतु आणखी असे की, असे संयत्र जर आंतर-राज्य व्यवहार करीत असेल किंवा त्याच्या वितरण परवानाधारक क्षेत्राच्या बाहेर मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून विजेची विक्री करीत असेल तर, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या अशा सर्व निर्मिती संयंत्रांना देखील या विनियमांच्या तरतुदी लागू राहतील.

परंतु आणखी असे की, हे विनियम राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या ५ मेगावॅट किंवा अधिक निर्यातक्षम निर्धारण असलेल्या ऊसाच्या चिपाड्यांवर आधारित सह-निर्मिती संयत्र/बायोमास संयत्रांना देखील लागू राहतील आणि अशा विक्रेत्यांना सामान्य विक्रेत्यांप्रमाणे मानण्यात येईल आणि विक्रेत्याच्या निर्धारणामध्ये नंतर प्रत्यक्ष झालेल्या बीज पुरवठ्यानुसार कोणताही बदल करण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, पवन आणि सौर निर्मितीच्या संबंधातील पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीच्या हिशोबपूर्ती संबंधातील बाबींचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणांमधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

परंतु आणखी असेही की, आयोगाकडून या संदर्भात पुढील अधिसूचना जारी करण्यात येईपर्यंत एमएसडब्ल्यु/आरडीएफ वर आधारित निर्मिती संयत्रांना या विनियमांतील तरतुदी लागू राहणार नाहीत.

(३) या विनियमांतर्गत तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती, राज्यात स्थित असलेल्या सर्व खरेदीदारांसह वितरण परवानाधारक, मानीव वितरण परवानाधारक आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेल्या पूर्णत: मुक्त प्रवेश ग्राहकांना लागू राहील.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला जोडलेल्या अंशत: मुक्त प्रवेश ग्राहकांच्या आणि वितरण जाळ्याशी जोडलेल्या सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांच्या तफावतीची हिशोबपूर्ती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणांमधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

५. राज्य भार प्रेषण केंद्र आणि राज्य संस्था (स्टेट एन्टीटी) यांची कर्तव्ये

(१) या विनियमांचा उद्देश, वेगेवगळ्या राज्य एन्टीटींच्या कार्याचे नियमन अशा रीतीने करण्यात यावे की ज्यायोगे अशा राज्य एन्टीटींनी अंत:क्षेपित केलेल्या आणि खेचलेल्या विजेच्या संबंधात

शिस्त राखण्यात यावी आणि विद्युत यंत्रणेची विश्वासार्हता आणि एकात्मता राखण्यात यावी, हा आहे.

(२) हे उद्दिष्ट गाठण्यासाठी, राज्य एन्टीटींच्या सहभागाकरिता आवश्यक पूर्व-अटी आणि प्रसंविदा खालीलप्रमाणे राहतील:

(ए) राज्य एन्टीटीज् ऊर्जेच्या देवाणघेवाणसाठी त्यांनी केलेल्या सर्व संविदांचा तपशील, संविदा दरासह, राज्य भार प्रेषण केंद्राला कळवतील.

(बी) राज्य एन्टीटीज् त्यांची उपकरणे आणि भार यांचे प्रचालन वेळोवेळी सुधारणा केलेल्या, भारतीय विद्युत ग्रिड संहिता, २०२३ आणि मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० यामधील तरतुदींशी सुसंगत राहील अशा रीतीने करतील.

(सी) राज्य एन्टीटीज्, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि त्यामधील सुधारणा आणि मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० आणि त्यामधील सुधारणांतील तरतुदींनुसार संबंधित पारेषण परवानाधारकाशी जोडणी करार/मुक्त प्रवेश करार करतील, ज्यामध्ये विश्वासार्ह प्रचालनासाठी प्रत्यक्ष आणि प्रचालनात्मक आवश्यकता विनिर्दिष्ट करण्यात येईल आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी प्रत्यक्ष संपर्क आणि जोडणी मिळवतील किंवा वितरण यंत्रणेच्या वापरासाठी संबंधित वितरण परवानाधारकाशी जोडणी करार/मुक्त प्रवेश करार, जसे असेल तसे, करतील.

(डी) राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), राज्य ग्रिड संहितेमधील मीटरींग संहितेच्या तरतुदींनुसार, विजेचे अंत:क्षेपण करण्याच्या आणि वीज खेचण्याच्या ठिकाणी १५ मिनिटांच्या नियत कालावधीत किंवा आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अन्य नियत कालावधीत ऊर्जा प्रवाहाची नोंद करण्यास सक्षम असलेले योग्य ते मीटर्स लावण्यासाठी, स्वयंचलित मीटर रिडिंग (एएमआर) सुविधेसह, आवश्यक व्यवस्था करेल. राज्य भार प्रेषण केंद्र ग्लोबल पोझिशनिंग यंत्रणेच्या माध्यमातून मीटरींग यंत्रणेतील वेळेच्या ताळमेळाचे (टाईम सिन्क्रोनायझेशन) प्रतिपरिक्षण करेल.

(इ) राज्य भार प्रेषण केंद्र पारेषण जाळ्यातील सर्व संभाव्य नेटवर्क मापदंड, अडचणी, अतिभार यांचे मूल्यांकन करुन केंद्राच्या प्रेषणाशी संबंधित सर्व निर्णय घेईल आणि पारेषण जाळ्यातील कोणत्याही अडथळ्याच्या परिस्थितीत, राज्य भार प्रेषण केंद्राने प्रेषण आणि वीज खेचण्याच्या संबंधात दिलेल्या सूचना सर्व राज्य एन्टीटींवर बंधनकारक राहतील.

(३) राज्य भार प्रेषण केंद्र, सर्व अन्य राज्य एन्टीटींना पूलमध्ये तसेच निकडीच्या परिस्थितीत,

असल्यास, ऊर्जेची देवाणघेवाण करण्यासाठी माहित असणे आवश्यक असलेली विजेच्या प्रेषणाच्या संबंधातील अशी सर्व माहिती प्रसिध्द करेल.

तफावत हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीच्या प्रचालनाची तत्त्वे

तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीच्या चौकटीमध्ये खालील महत्त्वाच्या मापदंडांचा समावेश असेल, जसे की, (ए) काल व परिमाण निर्धारण कालावधी (बी) काल व परिमाण निर्धारण आणि प्रेषणासाठी मार्गदर्शक तत्त्वे (सी) वारंवारतेच्या (फ्रिक्वेन्सी) प्रचालनाची श्रेणी (डी) तफावत (ई) हिशोबपूर्तीचा कालावधी.

(१) **काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) कालावधी :** काल व परिमाण निर्धारण कालावधीमध्ये ००.०० तासांपासून (भारतीय प्रमाण वेळ - आयएसटी) सुरु होणाऱ्या आणि २४.०० तासांमध्ये (भारतीय प्रमाण वेळ) संपणाऱ्या प्रत्येक १५ मिनिटांच्या *(किंवा वेळोवेळी स्वतंत्र आदेशाद्वारे ठरवून देण्यात येईल अशा अन्य कालावधीचा)* ९६ काल-गटांचा *(किंवा वेळोवेळी स्वतंत्र आदेशाद्वारे ठरवून देण्यात येईल अशा अन्य काल-गटांच्या संख्यांचा)* समावेश असेल. काल व परिमाण निर्धारण कालावधीचा पहिला काल-गट ००.०० तास (आयएसटी) ते ००.१५ तासांमध्ये (आयएसटी) सुरु होईल, काल व परिमाण निर्धारण कालावधीचा दुसरा काल-गट ००.१५ तास (आयएसटी) ते ००.३० तासांमध्ये(आयएसटी) सुरु होईल आणि त्यानंतर पुढील कालावधी किंवा आयोग विनिर्दिष्ट करेल अशा अन्य कालावधीमध्ये सुरु होईल.

(२) **काल व परिमाण निर्धारण आणि प्रेषणासाठी मार्गदर्शक तत्त्वे :** या विनियमांखालील सर्व सामान्य विक्रेते आणि खरेदीदार यांना मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० आणि त्यातील सुधारणा यामधील तरतुदींनुसार राज्य भार प्रेषण केंद्राने तयार केलेल्या काल व परिमाण निर्धारण आणि प्रेषणाची संहिता आणि कार्यपध्दतीचे मार्गदर्शक असतील.

डब्ल्युएस विक्रेत्यांचे काल व परिमाण निर्धारण आणि त्यांच्या तफावतींसाठीच्या लेखांकनाची तत्त्वे आणि त्यांच्या वाणिज्यिक हिशोबपूर्तीचे नियमन मविनिआ (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्यामधील सुधारणांनुसार करण्यात येईल.

मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार कमी खर्चाची वीज प्रथम खरेदी करण्यासंबंधीची (मेरीट ऑर्डर डिस्पॅच - एमओडी) मार्गदर्शक तत्त्वे आणि त्यावरील काल व परिमाण निर्धारण आणि प्रेषण कार्यपध्दती यांचे खालील तत्त्वांद्वारे नियमन करण्यात येईल:

(१) डे-अहेड निर्धारणादरम्यान विद्युत भार निर्मितीच्या संतुलनाच्या प्रयोजनासाठी, खरेदीदार/विद्युत कंपनी-निहाय कमी खर्चाची वीज प्रथम खरेदी करण्यासंबंधीचे

(एमओडी) तत्त्व अनुसरण्यात येईल.

(२) स्व-वापराकरिता निर्माण केलेल्या विजेच्या उपयोगकर्त्यांच्या आणि मुक्त प्रवेश ग्राहकांच्या वहन व्यवहारांचे प्रेषण, पारेषणातील अडचणी आणि यंत्रणेत उद्‌भवणाऱ्या आणिबाणीच्या स्थितीच्या अधीन राहून, करारानुसार करण्यात येईल.

(३) राज्य भार प्रेषण केंद्र खरेदीदार/वितरण परवानाधारकांमध्ये होणाऱ्या शिल्लक विजेच्या देवाणघेवाणीचे (असल्यास) स्वतंत्र लेखे ठेवेल आणि प्रसिध्द करेल.

(४) प्रत्यक्ष प्रचालना दरम्यान फ्रिक्वेन्सी, व्होल्टेजचे मापदंड आणि पारेषण वाहिनीवरील भार आणि उप-केंद्रावरील भाराच्या स्थितीसह ग्रीडच्या मापदंडांमध्ये राज्य ग्रिड संहिता किंवा आयइजीसीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुज्ञेय प्रचालनाच्या टप्प्यापलीकडे तफावत निर्माण झाल्यास, राज्य भार प्रेषण केंद्र विश्वासार्ह आणि सुरक्षित ग्रीडच्या प्रचालनासाठी किंवा सीईआरसी (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२४ आणि त्यामधील सुधारणांच्या तरतुदींशी सुसंगत असलेल्या डब्ल्युआरएलडीसीच्या सूचनांची पूर्तता केल्याबाबत खात्री करण्यासाठी उचित उपाययोजना करेल. त्यानुसार, राज्य भार प्रेषण केंद्र संपूर्ण राज्यासाठी केंद्रीकृत एमओडी तत्त्वानुसार आवश्यक प्रेषण किंवा कपातीच्या सूचना जारी करेल, जेणेकरुन भार-निर्मितीमध्ये संतुलन राखले जाईल आणि भारतीय विद्युत ग्रीड संहिता आणि राज्य ग्रीड संहितेमधील तरतुदींची पूर्तता होईल.

(५) राज्य भार प्रेषण केंद्र सुरक्षित ग्रीडच्या प्रचालनासाठी किंवा सीईआरसी (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२४ आणि त्यामधील सुधारणातील तरतुदींशी सुसंगत असलेल्या डब्ल्युआरएलडीसीच्या सूचनांची पूर्तता करण्यासाठी राज्य भार प्रेषण केंद्राने सुरु केलेल्या अशा कार्यवाहीचे स्वतंत्र लेखे ठेवेल आणि प्रसिध्द करेल. राज्य भार प्रेषण केंद्राच्या अशा हस्तक्षेपामुळे राज्य एन्टीटींमध्ये निर्माण झालेल्या वीज क्षमतेच्या देवाणघेवाणीचा, असल्यास, साप्ताहिक अहवाल राज्य भार प्रेषण केंद्र प्रसिध्द करेल.

(६) राज्य भार प्रेषण केंद्राने सुरु केलेल्या अशा कार्यवाहीमुळे झालेल्या विजेच्या देवाणघेवाणीची कालगट-निहाय हिशोबपूर्ती संबंधित काल गटासाठी संबंधित निर्मिती केंद्राला लागू असलेल्या संदर्भ आकारांच्या दराने किंवा केंद्रीय आयोगाने अधिसूचित केल्याप्रमाणे करण्यात येईल.

(३) **फ्रिक्वेन्सीसाठी प्रचालनाचा टप्पा :** काल-गटासाठी सरासरी ग्रीड फिक्वेन्सीकरिता सामान्य प्रचालनाचा टप्पा भारतीय विद्युत ग्रीड संहिता २०२३ आणि/किंवा मविनिआ (राज्य ग्रीड संहिता) विनियम, २०२० मध्ये वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या टप्प्याच्या धर्तीवर राहील. आयोगाने

वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या फ्रिक्वेन्सीच्या प्रचालन टप्प्याच्या मर्यादे पलीकडील कोणत्याही तफावतीस परवानगी देण्यात येणार नाही.

(४) **तफावत :** राज्य एन्टीटींमध्ये तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या प्रयोजनासाठी, राज्य भार प्रेषण केंद्र 'राज्य तफावत पूल अकाऊन्ट'करिता तफावतीचा हिशोब करेल, ज्यामध्ये प्रत्येक शेड्युलिंग कालावधीच्या संबंधात प्रत्येक राज्य एन्टीटीच्या ज्यादा वीज खेचणी/कमी वीज खेचणीच्या आणि ज्यादा अंत:क्षेपण आणि कमी अंत:क्षेपणाचा समावेश असेल. तफावतीसाठीचे आकार या विनियमांच्या विनियम ७ आणि १० नुसार राहतील.

(५) **हिशोबपूर्तीचा कालावधी** : प्रादेशिक तफावत हिशोबपूर्ती लेख्यांसाठी अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीच्या मिळत्याजुळत्या कार्यपध्दतीनुरुप राज्य तफावत पूल अकाऊन्ट तयार करण्यात येईल आणि त्याची हिशोबपूर्ती साप्ताहिक तत्त्वावर करण्यात येईल.

७. तफावतीसाठीची परिगणना

(१) सामान्य विक्रेत्यांसाठी काल-गटातील तफावतीची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल:

तफावत-सामान्य विक्रेता ($डी_{जीएस}$) (मेगावॅट तासात) = [(मेगावॅट तासामध्ये प्रत्यक्ष अंत:क्षेपण) - (मेगावॅट तासातील निर्धारित निर्मिती)

तफावत-सामान्य विक्रेता ($डी_{जीएस}$) (% मध्ये) = १०० x [(मेगावॅट तासामध्ये प्रत्यक्ष अंत:क्षेपण) - (मेगावॅट तासातील निर्धारित निर्मिती)] / (मेगावॅट तासातील निर्धारित निर्मिती).

(२) वरील विनियम जल-विद्युत निर्मिती केंद्रांना देखील लागू राहतील. जल-विद्युत निर्मिती केंद्रे सामान्य विक्रेत्यांप्रमाणेच हाताळण्यात येतील आणि खरेदीदारांच्या निर्धारणात प्रत्यक्षात निर्माण झालेल्या विजेनुसार नंतर बदल करण्यात येणार नाहीत.

(३) डब्ल्युएस विक्रेत्यांच्या तफावतीची परिगणना मविनिआ (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्यामधील सुधारणांनुसार करण्यात येईल.

(४) खरेदीदारांसाठी काल-गटातील तफावतीची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल:

तफावत - खरेदीदार ($डी_{बीयुवाय}$) (मेगावॅट तासात) = [(मेगावॅट तासामध्ये प्रत्यक्ष वीज खेचणी) - (मेगावॅट तासातील निर्धारीत वीज खेचणी).

तफावत - खरेदीदार ($डी_{बीयुवाय}$) (% मध्ये) = १०० x [(मेगावॅट तासामध्ये प्रत्यक्ष वीज खेचणी) - (मेगावॅट तासातील निर्धारीत वीज खेचणी)] / (मेगावॅट तासातील निर्धारीत वीज खेचणी).

८. तफावतीसाठीच्या आकारांचा सामान्य दर

(१) कोणत्याही विशिष्ट काल-गटासाठी किंवा केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तफावतीसाठीच्या आकारांचा सामान्य दर (एनआर) (ए), (बी) किंवा (सी) चा उच्चतम राहील, जेथे (ए), (बी) आणि (सी) खालीलप्रमाणे आहेत:

(ए) सर्व पॉवर एक्स्चेंजेसच्या एकीकृत-डे अहेड मार्केट सेगमेंटची भारांकित सरासरी एसीपी (पैसे/किलोवॅट तासात);

(बी) सर्व पॉवर एक्स्चेंजेसच्या रिअलटाईम मार्केट सेगमेंटची भारांकित सरासरी एसीपी (पैसे/किलोवॅट तासात);

(सी) खालील सर्वांची बेरीज:

(१) १/३ [सर्व पॉवर एक्स्चेंजेसच्या एकीकृत-डे अहेड मार्केट सेगमेंटची भारांकित सरासरी एसीपी (पैसे/किलोवॅट तासात)];

(२) १/३ [सर्व पॉवर एक्स्चेंजेसच्या रिअलटाईम मार्केट सेगमेंटची भारांकित सरासरी एसीपी (पैसे/किलोवॅट तासात)] ; आणि

(३) १/३ [उपयोजन केलेल्या आनुषंगिक सेवांचे एकूण प्रमाण (एसआरएएस अप आणि टीआरएएस अप) आणि सर्व प्रदेशांसाठी आनुषंगिक सेवा पुरवठादारांना देय असलेले नक्त आकार यांच्या आधारावर परिगणना केलेले आनुषंगिक सेवा आकार (पैसे/किलोवॅट तासात)]:

परंतु असे की, दिलेल्या दिवशी कोणत्याही काल-गटासाठी एसीपी अनुपलब्ध असल्यास, अंतिम उपलब्ध दिवसाच्या संबंधित काल-गटासाठीची एसीपी विचारात घेण्यात येईल.

(२) तफावतीसाठीच्या आकारांचा सामान्य दर सर्वात नजिकच्या तीन दशांश स्थळांपर्यंत पुर्णांकात करण्यात येईल.

९. गेमिंगसाठी उपाययोजना

(१) आयोग, स्वत:हून किंवा राज्य भार प्रेषण केंद्र किंवा अन्य बाधित पक्षकाराने केलेल्या याचिकेवर, गेमिंगच्या आरोपाखालील कोणत्याही सामान्य विक्रेता किंवा कोणत्याही खरेदीदाराविरुध्द कारवाई सुरु करु शकेल आणि आवश्यकता असल्यास, आयोगाला योग्य वाटेल अशा आयोगाच्या अधिकाऱ्याद्वारा किंवा अन्य पक्षकाराद्वारा चौकशी करण्याचे आदेश देऊ शकेल. अशा रीतीने नियुक्त केलेला चौकशी अधिकारी आयोगाकडून निश्चित करण्यात येईल त्या वेळेत त्याचे निष्कर्ष सादर करेल आणि असा चौकशी अधिकारी किंवा प्राधिकारी अधिनियमाच्या कलम १२८ अंतर्गत अभिप्रेत असल्याप्रमाणे सर्व अधिकारांचा वापर करेल.

(२) या संबंधात वरील खंड (१) अंतर्गत आयोगाने सुरु केलेल्या कारवाईमध्ये किंवा त्या संबंधात केलेल्या चौकशीमध्ये जर कोणताही विक्रेता किंवा कोणताही खरेदीदार गेमिंगमध्ये गुंतला असल्याचे सिध्द झाले तर, आयोग अधिनियम किंवा त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही विनियमांतर्गत अन्य कोणत्याही कारवाईस बाधा न आणता, अशा सामान्य विक्रेता किंवा खरेदीदाराच्या अशा गेमिंगच्या कालावधीमधील तफावतीच्या कोणत्याही आकारांना परवानगी नाकारु शकेल.

१०. तफावतीसाठी आकार

(१) सामान्य विक्रेत्यांच्या (आरओआर निर्मिती केंद्राव्यतिरिक्त) संबंधात तफावतीसाठीचे आकार खालील प्रमाणे राहतील:

ज्यादा अंत:क्षेपणाच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून प्राप्य)	**कमी अंत:क्षेपणाच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून देय)**
(एक) [१०% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट*, यापैकी जे कमी असेल] पर्यंत तफावतीसाठी आणि *f* बँडच्या आतील *f*	
(१) @ आरआर जेव्हा [४९.९७ Hz ≤ f ≤५०.०३ Hz]	(४) @ आरआर जेव्हा [४९.९७ Hz ≤ f ≤५०.०३ Hz]
(२) जेव्हा [५०.०३ Hz < *f* ≤५०.०५ Hz], *f* मधील प्रत्येक ०.०१ Hz वाढीसाठी, अशा विक्रेत्यासाठी तफावत आकार आरआरच्या २५ % ने कमी करण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार आरआर च्या ५० % होतील जेव्हा *f* = ५०.०५ Hz	(५) जेव्हा [५०.०३ Hz < *f* ≤५०.०५ Hz], *f* मधील प्रत्येक ०.०१ Hz वाढीसाठी, अशा विक्रेत्यासाठी तफावत आकार आरआरच्या ७.५ % ने कमी करण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार आरआर च्या ८५ % होतील जेव्हा *f* = ५०.०५ Hz
(३) जेव्हा [४९.९७ Hz > f ≥ ४९.९० Hz], *f* मधील प्रत्येक ०.०१ Hz घटीसाठी, अशा विक्रेत्यासाठी तफावत आकार आरआरच्या २.१५% ने वाढवण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार आरआर च्या ११५ % होतील जेव्हा *f* = ४९.९०Hz	(६) जेव्हा [४९.९७ Hz > f ≥ ४९.९० Hz], *f* मधील प्रत्येक ०.०१ Hz घटीसाठी, अशा विक्रेत्यासाठी तफावत आकार आरआरच्या ७.१५% ने वाढवण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार आरआर च्या १५० % होतील जेव्हा *f* = ४९.९०Hz
(दोन) [१०% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट*, यापैकी जे कमी असेल] पर्यंत तफावतीसाठी आणि *f* बँडच्या बाहेरील *f*	
(१) @ शून्य जेव्हा [५०.०५ Hz < f < ५०.१० Hz]: परंतु असे की असा विक्रेता @ आरआरच्या १०	(३) @ आरआरच्या ८५ % जेव्हा [f > ५०.०५ Hz]

% अदा करेल जेव्हा [f ≥ ५०.१० Hz]	
(२) @ आरआरच्या ११५ % जेव्हा [f < ४९.९० Hz]	(४) @ आरआरच्या १५० % जेव्हा [f < ४९.९० Hz]
(तीन) [१०% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट*, यापैकी जे कमी असेल] पलीकडे तफावतीसाठी आणि *f* बँडच्या आतील आणि बाहेरील *f*	
(१) @ शून्य जेव्हा (*f* < ५०.१० Hz): परंतु असे की असा विक्रेता आरआरच्या @ १० % अदा करेल जेव्हा [f ≥ ५०.१० Hz]	@ आरआर जेव्हा [f ≥ ५०.०० Hz]; @ आरआरच्या १५० % जेव्हा [४९.९०Hz ≤ f < ५०.०० Hz]; आणि @ आरआरच्या २०० % जेव्हा [f < ४९.९० Hz]

टिपणी: यंत्रणा फ्रिक्वेन्सी = f आणि f बँड = [४९.९०Hz ≤ f ≤५०.०५ Hz]

**समान वीज दराच्या संचांसाठी संयत्र स्तरावर ३० मेगावॅट. परंतु आणखी असे की, सामान्य विक्रेत्यासाठी (आरओआर निर्मिती केंद्रा व्यतिरिक्त) चाचणी प्रचालना दरम्यान खालील व्हॉल्युम मर्यादा लागू राहील.*

संयत्राची स्थापित क्षमता (मेगावॅट)	***१००० मेगावॅट पेक्षा कमी***	***१००० मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त परंतु १५०० मेगावॅट पेक्षा कमी***	***१५०० मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त***
लागू असलेली मात्रा मर्यादा	*D_{GS} च्या १०% किंवा ३० मेगावॅट यापैकी जे कमी असेल*	*D_{GS} च्या १०% किंवा ६० मेगावॅट यापैकी जे कमी असेल*	*D_{GS} च्या १०% किंवा १०० मेगावॅट यापैकी जे कमी असेल*

आयोग डीएसएम कार्यकारी गटाच्या शिफारशींच्या आधारावर वरील व्हॉल्युम मर्यादेचा आढावा घेईल.

(२) आरओआर निर्मिती केंद्र असलेल्या सामान्य विक्रेत्याच्या संबंधात, ग्रिड फ्रिक्वेन्सीशी कोणत्याही लिंकेज व्यतिरिक्त, तफावतीसाठीचे आकार खालील प्रमाणे राहतील:

ज्यादा अंत:क्षेपणाच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून प्राप्य)	**कमी अंत:क्षेपणाच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून देय)**
[१५% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट, यापैकी जे कमी असेल] पर्यंतच्या तफावतीसाठी @ आरआर; [१५% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट, यापैकी जे कमी असेल] पलीकडील	[१५% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट, यापैकी जे कमी असेल] पर्यंतच्या तफावतीसाठी @ आरआर; [१५% डी*जीएस* किंवा ३० मेगावॅट, यापैकी जे कमी असेल] पलीकडील आणि [२०% डी*जीएस* किंवा ५० मेगावॅट, यापैकी जे कमी असेल] पर्यंतच्या

ज्यादा अंत:क्षेपणाच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून प्राप्य)	कमी अंत:क्षेपणाच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून देय)
तफावतीसाठी @ शून्य;	तफावतीसाठी @ आरआरच्या १०५ %; [२०% डी*जीएस* किंवा ५० मेगावॅट, यापैकी जे कमी असेल] पलीकडील तफावतीसाठी @ आरआरच्या ११०%;

* *समान वीज दराच्या संचांकरिता संयत्र स्तरावर ३० मेगावॅट.*

(३) ग्रीडची फ्रिक्वेन्सी "४९.९० हर्टझ पेक्षा कमी" असेल तेव्हा कोणत्याही विक्रेत्याचे कमी अंत:क्षेपण अनुज्ञेय राहणार नाही आणि ग्रीडची फ्रिक्वेन्सी "५०.१०हर्टझ् आणि त्यापेक्षा जास्त" असेल तेव्हा कोणत्याही विक्रेत्याचे जास्त अंत:क्षेपण अनुज्ञेय राहणार नाही.

(४) डब्ल्युएस विक्रेता तसेच क्युसीएद्वारे पुलिंग स्टेशनवर एकत्रित अशा वीज निर्मिती केंद्रांच्या बाबतीत तफावतीसाठीचे आकार, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ आणि त्यामधील सुधारणांनुसार असतील:

(५) स्टॅण्डअलोन ऊर्जा साठवण यंत्रणेच्या (इएसएस) संबंधात तफावतीसाठीचे आकार या विनियमांच्या खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार सामान्य विक्रेत्यांना (आरओआर निर्मिती केंद्रा व्यतिरिक्त) लागू असल्याप्रमाणेच असतील:

परंतु असे की, चार्जिंग मोडमध्ये, जास्तीच्या वीज खेचणीद्वारे झालेली तफावत कमी अंत:क्षेपण म्हणून मानण्यात येईल आणि कमी वीज खेचणीद्वारे झालेली तफावत जास्त अंत:क्षेपण म्हणून मानण्यात येईल आणि त्यानुसार तफावतीसाठीच्या आकारांची हिशोबपूर्ती करण्यात येईल:

(६) खरेदीदाराच्या संबंधात तफावतीसाठीचे आकार खालीलप्रमाणे प्राप्य किंवा देय राहतील:

कमी वीज खेचणीच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून प्राप्य)	ज्यादा वीज खेचणीच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून देय)
(पाच) व्हीएल*f* (१) आणि f आतील *f* बँड साठी	
(१) @ एनआरच्या ९० % जेव्हा *f* = ५०.०० Hz;	(४) @ एनआर जेव्हा *f* = ५०.०० Hz;
(२) जेव्हा [५०.०० Hz < *f* ≤५०.०५ Hz], *f* मधील प्रत्येक ०.०१ Hz वाढीसाठी, अशा खरेदीदारासाठी तफावत आकार एनआरच्या ८% ने कमी करण्यात येतील जेणेकरुन	(५) जेव्हा [५०.०० Hz < *f* ≤५०.०५ Hz], *f* मधील प्रत्येक ०.०१ Hz वाढीसाठी, अशा खरेदीदारासाठी तफावत आकार एनआरच्या ५% ने कमी करण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार एनआर च्या ७५ % होतील जेव्हा *f* =

UNCOMPLICATE Simplifying compliance

कमी वीज खेचणीच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून प्राप्य)	ज्यादा वीज खेचणीच्या परिणामस्वरुप तफावत (विक्रेत्याकडून देय)
तफावतीसाठीचे आकार एनआर च्या ५० % होतील जेव्हा f = ५०.०५ Hz;	५०.०५ Hz;
(३) जेव्हा [५०.०० Hz > f ≥ ४९.९० Hz], f मधील प्रत्येक ०.०१ Hz घटीकरिता, अशा खरेदीदारासाठी तफावत आकार एनआरच्या १ % ने वाढवण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार एनआर च्या १०० % होतील जेव्हा f = ४९.९० Hz;	(६) जेव्हा [५०.०० Hz > f ≥ ४९.९० Hz], f मधील प्रत्येक ०.०१ Hz घटीकरिता, अशा खरेदीदारासाठी तफावत आकार एनआरच्या ५ % ने वाढवण्यात येतील जेणेकरुन तफावतीसाठीचे आकार एनआर च्या १५० % होतील जेव्हा f = ४९.९० Hz;
(सहा) **व्हीएलसी (१) आणि *f बाहेरील f* बॅन्डसाठी**	
(१) @ शून्य जेव्हा [५०.०५ Hz < f < ५०.१० Hz]: परंतु असे की असा खरेदीदार @ एनआरच्या १० % अदा करेल जेव्हा [f ≥ ५०.१० Hz]	(३) @ एनआरच्या ५० % जेव्हा [५०.०५ Hz < f < ५०.१० Hz]: (४) @ शून्य जेव्हा [f ≥ ५०.१० Hz];
(२) @ एनआर जेव्हा [f < ४९.९० Hz];	(५) @ एनआरच्या १५० % जेव्हा [f < ४९.९० Hz];
(सात) **व्हीएलसी (२) आणि *f आतील आणि बाहेरील f* बॅन्डसाठी**	
(१) @ एनआरच्या ८० % जेव्हा f ≤ ५०.०० Hz; (२) @ एनआरच्या ५० % जेव्हा [५०.०० Hz < f ≤ ५०.०५ Hz]; (३) @ शून्य जेव्हा [५०.०५ Hz < f < ५०.१० Hz]; परंतु असे की असा खरेदीदार @ एनआरच्या १० % अदा करेल जेव्हा [f ≥ ५०.१० Hz];	(१) @ एनआरच्या १५० % जेव्हा f < ५०.०० Hz; (२) @ एनआर जेव्हा [५०.०० Hz ≤ f ≤ ५०.०५ Hz]; (३) @ एनआरच्या ७५ % जेव्हा [५०.०५ Hz < f < ५०.१० Hz]; @ शून्य जेव्हा [f ≥ ५०.१० Hz].
(आठ) **व्हीएलसी (३) आणि *f आतील आणि बाहेरील f* बॅन्डसाठी**	
(१) @ शून्य जेव्हा f < ५०.१० Hz परंतु असे की असा खरेदीदार @ एनआरच्या १० % अदा करेल जेव्हा [f ≥ ५०.१० Hz];	(१) @ एनआरच्या २०० % जेव्हा f <५०.०० Hz; (२) @ एनआर जेव्हा [५०.०० Hz ≤ f < ५०.१० Hz] @ एनआरच्या ५० % जेव्हा [f ≥ ५०.१० Hz].

टिपणी: खरेदीदारासाठी मात्रा मर्यादा

(७) खरेदीदारावर तफावतीच्या आकारमानवरील मर्यादा आणि मर्यादा ओलांडण्याचे परिणाम -

(ए) ग्रीडची फिक्वेन्सी जेव्हा '४९.९० हर्टझ आणि त्यापेक्षा अधिक ते ५०.०५ हर्टझ पेक्षा कमी' या मर्यादेत असते तेव्हा, कोणत्याही खरेदीदाराने काल-गटादरम्यान केलेली जास्तीची वीज खेचणी किंवा कमी-वीज खेचणी त्याच्या निर्धारित वीज खेचणीच्या १० टक्क्यांपेक्षा किंवा या विनियमांच्या खंड(बी) नुसार आलेल्या [व्हीएलबी(१)] मेगावॅट मर्यादेपेक्षा, यापैकी जे कमी असेल, जास्त असणार नाही.

(बी) वितरण परवानाधारक आणि खरेदीदारांसाठी [व्हीएलबी(१)] मेगावॅटची मात्रा मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल:

(१) (निर्धारणाच्या १०%, (वितरण परवानाधारकाची किंवा खरेदीदारांची सर्वोच्च मागणीच्या काळातील मागणी / "एनसीपीडी) x राज्य मात्रा मर्यादा) यांच्यापैकी जे कमी असेल ते

जेथे, एनसीपीडी (एकाच वेळी नसलेली सर्वोच्च मागणी) वितरण परवानाधारक/परवानाधारकांच्या आणि खरेदीदार/खरेदीदारांच्या सर्वोच्च मागणीच्या काळातील विजेच्या मागणीची बेरीज दर्शविते.

जेथे, वितरण परवानाधारक/परवानाधारकांची आणि खरेदीदार/ खरेदीदारांची सर्वोच्च मागणीच्या काळातील विजेची मागणी (पीक डिमांड) मागील कॅलेण्डर वर्षात नोंद झालेली पीक डिमांड किंवा त्यानंतरच्या कॅलेण्डर वर्षातील वितरण परवानाधारक/परवानाधारकांची आणि खरेदीदार/ खरेदीदारांची अंदाजित पीक डिमांड, यापैकी जी जास्त असेल ती, असेल;

परंतु असे की, समांतर वितरण परवानाधारक क्षेत्रातील चेंजओव्हर ग्राहकांच्या बाबतीत, वितरण जाळ्याचा मालक असलेल्या वितरण परवानाधारकाला चेंजओव्हर ग्राहकांच्या मागणीचा हिशोब ठेवण्यासाठी, सन २०२१ च्या प्रकरण क्र. १६६ मध्ये दि. १५.०९.२०२२ रोजी आयोगाने दिलेल्या आदेशातील निर्देशानुसार, अतिरिक्त मात्रा मर्यादा प्रदान करण्यात येईल.

(२) एसएलडीसी मागील पीक डिमांड, मागील कॅलेण्डर वर्षासाठी (जानेवारी ते डिसेंबर) राज्यात प्रचलित असलेली नॉन-कोइन्सीडेन्ट पीक डिमांड आणि चालू आर्थिक वर्षाच्या ३१ जानेवारी पर्यंत आगामी वर्षासाठी लागू असलेली राज्य मात्रा मर्यादा यांच्या आधारावर प्रत्येक खरेदीदार किंवा वितरण परवानाधारकासाठी आगामी वर्षासाठी लागू करावयाची व्हीएलबी(१), व्हीएलबी(२) आणि व्हीएलबी(३) निश्चित करेल आणि आयोगाच्या मान्यतेसाठी ती सादर करेल.

(३) २५० मेगावॅट पेक्षा कमी पीक डिमांड असलेल्या वितरण परवानाधारक किंवा खरेदीदारांना खालीलप्रमाणे मात्रा मर्यादा लागू राहण्याच्या अधीन राहून, वरील सुत्रानुसार वितरण

परवानाधारक किंवा खरेदीदारांसाठी निश्चित केलेल्या मात्रेची मर्यादा सर्वात जवळच्या पूर्णांक मूल्यात देण्यात येईल:

सर्वोच्च मागणीचा टप्पा (मेगावॅट)	मेगावॅटमध्ये मात्रा मर्यादा [व्हीएलबी(१)]
०-१०	०.५०
११-३०	०.७५
३१-६०	१.००
६१-१००	१.२५
१०१-१५०	१.५०
१५१-२००	१.७५
२०१-२५०	२.००
२५० पेक्षा जास्त	वरील विनियम (७) च्या उप-विनियम (बी) च्या उप-खंड (१) नुसार

(सी) वितरण परवानाधारक आणि खरेदीदारांसाठी [व्हीएलबी(२)] मेगावॅटची मात्रा मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल:

खरेदीदार	मेगावॅटमध्ये व्हीएलबी(२) मात्रा मर्यादेची श्रेणी
सर्व खरेदीदारांसाठी	व्हीएलबी(२) = व्हीएलबी(१) + व्हीएलबी(१) च्या २० %

(डी) वितरण परवानाधारक आणि खरेदीदारांसाठी व्हीएलबी(३) मेगावॅटची मात्रा मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल:

खरेदीदार	मेगावॅटमध्ये व्हीएलबी(३) मात्रा मर्यादेची श्रेणी
सर्व खरेदीदारांसाठी	व्हीएलबी(३) = व्हीएलबी(२) च्या वर

(इ) केंद्रीय विद्युत नियामक आयोग (तफावत हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०२४ आणि त्यामध्ये झालेल्या सुधारणांनुसार, राज्य मात्रा मर्यादा राज्याला लागू असलेल्या मात्रा मर्यादेशी (व्हीएल) जोडण्यात येईल;

परंतु असे की, जेव्हा ग्रीडची फ्रिक्वेन्सी "४९.९० हर्टझ पेक्षा कमी" असेल तेव्हा कोणत्याही खरेदीदाराची ज्यादा वीज खेचणी अनुज्ञेय राहणार नाही आणि ग्रीडची फ्रिक्वेन्सी "५०.१० हर्टझ् आणि त्यापेक्षा जास्त" असेल तेव्हा कोणत्याही खरेदीदाराची कमी वीज खेचणी अनुज्ञेय राहणार नाही.

(८) या विनियमांच्या खंड (ए) आणि (बी) अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त प्रारंभिक विजेच्या (इन्फर्म पॉवर) अंत:क्षेपणासाठीचे आकार शून्य असतील.

(ए) औष्णिक निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, संयत्राचे पहिल्यांदा सिन्क्रोनायझेशन झाल्याच्या दिनांकापासून यशस्वीरित्या ट्रायल रन पूर्ण करेपर्यंत ग्रिडमध्ये अंत:क्षेपित केलेल्या विजेसाठी, प्रत्येक काल-गटासाठी तफावतीकरिता आकारांच्या सामान्य दराने रु. २.८६ प्रति युनिट सिलिंगच्या अधीन राहून किंवा केंद्रीय आयोगाने अधिसूचित केल्याप्रमाणे, किंवा एमओडी स्टॅकमधील सर्वात कमी अस्थिर खर्चाची, यापैकी जे कमी असेल ते, रक्कम अदा करण्यात येईल.

(बी) ग्रीड संहितेमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार यशस्वीरित्या चाचणी पूर्ण केल्यानंतर प्रारंभिक विजेचे (इन्फर्म पॉवर) निर्धारण करण्यात आले तर, निर्धारित केलेल्या प्रारंभिक विजेवरील तफावतीसाठी सामान्य विक्रेत्याला लागू असल्याप्रमाणेच तफावत आकार लागू राहतील.

(सी) या विनियमांच्या खंड (ए) आणि (बी) मध्ये काहीही असले तरी, जेव्हा यंत्रणा फ्रिक्वेन्सी f > ५०.०५Hz असते तेव्हा सामान्य विक्रेत्याने जास्तीच्या अंत:क्षेपणाद्वारे यशस्वी ट्रायल रन दिल्यानंतरच्या निर्धारित प्रारंभिक विजेच्या तफावतीसाठीचे आकार शून्य राहतील.

(९) निर्मिती संयत्राच्या वाणिज्यिक कामकाजाच्या दिनांकाआधी (सीओडी) प्रारंभिक (स्टार्ट-अप) विजेच्या खेचणीसाठी किंवा निर्मिती केंद्राच्या शट-डाऊन दरम्यान सहाय्यकारी उपकरणे चालू ठेवण्यासाठी खेचलेल्या विजेसाठी संबंधित काल-गटासाठीचे आकार संदर्भ आकार दराने किंवा संविदा दराने किंवा संदर्भ आकार दरांच्या किंवा संविदा दरांच्या अनुपस्थितीत, सर्व पॉवर एक्स्चेंजच्या डे-अहेड मार्केट सेगमेंटच्या भारांकित सरासरी एसीपी दराने किंवा केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, जसे असेल तसे, देय राहतील.

(१०) या विनियमांच्या खंड (१) ते (८) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, विक्रेत्याच्या सक्तीच्या आऊटेज किंवा अंशत: आऊटेजच्या बाबतीत तफावतीसाठीचे आकार, आठ काल-गटांच्या कमाल कालावधीसाठी किंवा त्यांच्या निर्धारणामध्ये सुधारणा होईपर्यंतच्या कालावधीसाठी, यापैकी जे आधी घडेल ते, संदर्भ आकार दराने देय राहतील.

(११) एचपी-डीएएम मध्ये ज्याच्या बोली क्लियर झाल्या आहेत अशा विक्रेत्यासाठी, एचपी-डीएएमद्वारे विकलेल्या विजेच्या परिमाणासाठी 'कमी अंत:क्षेपणा'च्या माध्यमातून घेतलेल्या तफावतीसाठी 'संदर्भ आकार दर' संबंधित काल-गटासाठी सर्व पॉवर एक्स्चेंजच्या एचपी-डीएएम मार्केट सेगमेंटच्या भारांकित सरासरी एसीपी इतके असतील;

परंतु असे की, जेथे मीटरच्या माहितीचे प्रत्यक्ष पृथक्करण शक्य नसते तेव्हा, संबंधित एन्टीटीच्या तफावतीची किंवा मीटरने नोंदवलेल्या माहितीच्या वाटपाची परिगणना एन्टीटीज्च्या निर्धारणाच्या आधारावर यथाप्रमाण तत्त्वावर करण्यात येईल.

११. व्हीएसईसाठी प्रचालनात्मक चौकट आणि त्याची वाणिज्यिक हिशोबपूर्ती

(१) प्रत्यक्ष प्रचालना दरम्यान, एसएलडीसीला राज्याची वीज खेचणी राज्याच्या सीमेवर अनुज्ञेय मर्यादेत राखण्यासाठी किंवा आरएलडीसीच्या सूचनांचे पालन करण्यासाठी किंवा आयईजीसी किंवा राज्य ग्रिड संहितेच्या शेड्युलिंग आणि प्रेषण संहितेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अटींचे पालन करण्यासाठी वीज निर्मितीचा वेग वाढविण्याच्या-रॅम्प अप (वाढ) किंवा वीज निर्मितीचा वेग कमी करण्याच्या-रॅम्प डाऊन (कमी) सूचना जारी करण्याची आवश्यकता भासू शकते.

(२) या विनियमांच्या आणि मविनिआ (राज्य ग्रिड संहिता) विनियम, २०२० मधील तरतुदींनुसार, एसएलडीसी राज्याच्या सीमेवरील वीज खेचणी मर्यादेत राखण्यासाठी अशा प्रत्यक्ष प्रचालना दरम्यान केंद्रीकृत एमओडी तत्त्वाचे अनुसरण करेल.

(३) केंद्रीकृत एमओडी तत्त्वानुसार जनरेटरच्या निर्धारणामध्ये सुधारणा करताना, एसएलडीसी त्या जनरेटरने करारबध्द केलेल्या लाभधारकाच्या, म्हणजे असा लाभधारक ज्याच्याशी त्याचा वीज खरेदी करार (पीपीए) किंवा वाणिज्यिक व्यवस्था झालेली आहे, निर्धारणामध्ये तद्नुसार सुधारणा करणार नाही.

(४) काल व परिमाण निर्धारण आणि प्रेषण संहितेमधील तरतुदी आणि त्याखाली विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपध्दतीनुसार लाभधारकांना त्यांच्या मागणीच्या आधारावर निर्धारण चालू ठेवण्यात येईल.

(५) शेड्युलिंग प्रक्रियेच्या प्रयोजनासाठी एसएलडीसीद्वारे राज्यासाठी आभासी राज्य एन्टीटी (व्हीएसई) तयार करण्यात येईल जी जनरेटर्सच्या अशा निर्धारणाचा प्रति-पक्ष म्हणून कार्य करेल. आभासी राज्य एन्टीटी, त्याच्या स्वरुपानुसार, मीटर्सने वेढलेली प्रत्यक्ष एन्टीटी नसते आणि त्यामुळे, राज्य डीएसएम पूलचा ती एक भाग नसेल.

(६) केंद्रीकृत एमओडी तत्त्वाच्या अनुषंगाने एसएलडीसीने प्रेषणासाठी विचारात घेतलेल्या जनरेटरच्या शेड्युलमध्ये एसएलडीसीद्वारे प्रेषण केलेल्या निर्मितीचे परिमाण थेट समाविष्ट करण्यात येईल. अशा जनरेटरच्या निर्धारणामध्ये एसएलडीसीकडून यंत्रणेच्या प्रत्यक्ष स्थितीनुसार सुधारणा करण्यात येईल.

(७) वीज निर्मितीमध्ये वाढ करण्यासाठी (जनरेशन रॅम्प अप), केंद्रीकृत एमओडी तत्त्वानुसार एसएलडीसीने प्रेषणासाठी विचारात घेतलेल्या जनरेटरमधून व्हिएसईला वीज निर्धारित करण्यात येईल आणि वीज निर्मिती कमी करण्यासाठी (जनरेशन रॅम्प डाऊन), केंद्रीकृत एमओडी तत्त्वावर एसएलडीसीने प्रेषणासाठी विचारात घेतलेल्या जनरेटरला व्हिएसईकडून वीज निर्धारित करण्यात येईल.

(८) अशा जनरेटर्सचे निर्धारण एसएलडीसीने प्रेषण सूचना जारी केल्यानंतर १५ मिनिटांपासून सुरु होणाऱ्या काल-गटापासून त्वरित चालू होईल आणि प्रेषण सूचनेमध्ये याबाबत स्पष्टपणे विनिर्दिष्ट करण्यात येईल. तथापि, एसएलडीसी उपरोल्लेखित काल-गटानंतर कोणत्याही काल गटापासून प्रेषण विचारात घेण्यासाठी, आवश्यकता असल्यास, अपेक्षित यंत्रणा स्थितीच्या आधारावर उचित निर्णय घेईल.

(९) अशा जनरेटरचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) एक्स-बस सीमेवर एमइजीसी २०२० अंतर्गत शेड्युलिंग संहितेनुसार असेल.

(१०) अशा *जन्रेटर्सचे* निर्धारण व्हिएसई अंतर्गत एसएलडीसीने सुधारित केलेल्या निर्धारणाच्या प्रमाणानुसार विचारात घेण्यात येईल.

(११) अशा विक्रेत्याने निर्धारणापासून घेतलेल्या संपूर्ण तफावतीची हाताळणी या विनियमांच्या विनियम ७ आणि १० मधील तरतुदींनुसार आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

